प्रजावाणी दि.17/01/2022

प्रजावाणी दि.17/01/2022

# सुगाव दुहेरी मृत्यूकांड प्रकरणी पाच आरोपींना पुण्यातून अटक

## ▪ दोन महिन्यांपासून होते फरार ▪ देगलूर पोलिसांची कामगिरी

देगलूर (वार्ताहर), दि.१६: मुलीच्या सासर मंडळीच्या अवाजावी रकमेच्या मागणीला वैतागलेल्या पित्याने आत्महत्या केल्याची घटना दि. १४ नोव्हेंबर २१ रोजी सुगाव येथे घडली होती. या घटनेच्या धक्क्याने त्या पित्याच्या विवाहित मुलीचाही मृत्यू झाला होता. अशा दुहेरी मृत्यूकांडातील गेल्या दोन महिन्यापासून फरार असलेल्या पाच आरोपीना देगलूर पोलिसांनी पुणे येथून दि १५ जानेवारी अटक केली आहे.

तालुक्यातील सुगाव येथील शंकरराव परशुराम भोसले यांची मुलगी माधुरी हिचा विवाह उंदरी येथील संदीप हनुमंत वडजे याच्याशी दि.११ जुलै २०२० रोजी झाला होता. लग्नाच्या काही काळानंतर संदीप वडजे हा माधुरीस तुझ्या माहेरच्या मंडळीकडून मला प्लॉट व गाडी घेण्यासाठी पाच लाख रुपये आणून दे, असा तगादा लावून शारीरिक व मानसिक छळ करीत होता.

इकडे वडिलांची जेमतेम आर्थिक परिस्थिती असल्याने माधुरी विवेचनात पडली होती. शेवटी माधुरीने सासरच्या त्रासास कंटाळून ही माहिती वडिलांना सांगितली. वडील शंकरराव भोसले यांनी जावई संदीप वडजे व व्याही हनुमंत वडजे या दोघांना माझ्या मुलीस त्रास देऊ नका, अशी विनंती करून मुलीला सुगाव येथे आणून घेतले होते.

त्यानंतरही सासरच्या मंडळीकडून पाच लाख रुपयांसाठी मुलीकडे तगादा चालूच होता. मुलीच्या सासर मंडळीच्या अवाजावी रक्कमेच्या मागणीला वैतागून शेवटी शंकरराव भोसले यांनी आत्महत्या केली. ही घटना विवाहित माधुरीस समजतात तिला जबर मानसिक धक्का बसून तिचाही मृत्यू झाला.

अशा दुहेरी मृत्यूकांड प्रकरणी मयताची पत्नी म्हणजेच त्या मुलीची आई अनिता शंकरराव भोसले हिच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात जावई संदीप हनुमंत वडजे, सासरा हनुमंत वडजे, सासू रावणबाई वडजे, नणंद प्रणिता वडजे, दुसरी नणंद शिल्पा वडजे अशा पाच जणांवर गुन्हा दाखल झाला होता.

गेल्या दोन महिन्यापासून हे पाच आरोपी फरार होते. पोनि. सोहन माछरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि. रवी मुंडे व त्यांचे मुन्शी पत्रे यांनी धनराज भोसले आणि प्रवीण तरटे यांच्या माहितीच्या लोकेशनद्वारे पुण्यातून संदीप वडजे यास अटक केली. तर उर्वरित चार आरोपींना तळेगाव दाभाडे येथून अटक केली आहे. देगलूर पोलिसांना दोन महिन्यापासून गुंगारा देणाऱ्या आरोपींचा अखेर छडा लावला आहे. या पाचही आरोपींना येथील न्यायालयात सोमवार दि. १७ रोजी हजर केले जाणार असल्याची माहिती तपासी अधिकारी पोउपनि. रवी मुंडे यांनी दिली.